जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
7 NOV 2017

पुढारी

# बेल्जियन ॲकॅडेमिक लंचसाठी कुलगुरु डॉ. शिंदे यांना विशेष निमंत्रण

**कोल्हापूर :** बेल्जियन राजे फिलीप आणि राणी मॅथिल्ड हे शाही दाम्पत्य सध्या भारत भेटीवर आहेत. त्यांच्या उपस्थितीत नवी दिल्ली येथे आयोजित ॲकॅडेमिक लंच'साठी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांना विशेष निमंत्रण देण्यात आले आहे. बेल्जियनचे शाही दाम्पत्य सात दिवसांच्या भारत भेटीवर आले आहेत. बुधवारी दुपारी साडेबारा वाजता नवी दिल्ली येथील ताज डिप्लोमेटीक एन्क्लेव हॉटेलमध्ये 'विशेष ॲकॅडेमिक लंच' चे आयोजन करण्यात आले आहे.. यावेळी देशभरातील निवडक शिक्षणतज्ञांसमवेत शाही दाम्पत्य चर्चा करणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
7 NOV 2017
पुण्यनगरी

# बेल्जियन अॅकॅडेमिक लंचसाठी कुलगुरू शिंदे यांना निमंत्रण

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** बेल्जियन राजे फिलीप आणि राणी मॅथिल्ड हे शाही दांपत्य सध्या भारत भेटीवर आले असून त्यांच्या उपस्थितीत नवी दिल्ली येथे आयोजित करण्यात आलेल्या 'अकॅडेमिक लंच'साठी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांना विशेष निमंत्रण देण्यात आले आहे. बेल्जियनच्या शाही दांपत्याचे रविवारी सात दिवसांच्या भारत भेटीसाठी आगमन झाले आहे. येत्या बुधवारी (दि. ८) दुपारी १२.३० वाजता नवी दिल्ली येथील ताज डिप्लोमॅटिक एन्क्लेव हॉटेलमध्ये विशेष अॅकॅडेमिक लंचचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी देशभरातील निवडक शिक्षण तज्ज्ञांसमवेत राजदांपत्य चर्चा करणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
7 NOV 2017
लोकमत

# एन.डी. यांच्या प्रकृतीची कुलगुरुंकडून विचारपूस

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : ज्येष्ठ विचारवंत प्रा. एन. डी. पाटील यांच्या निवासस्थानी रविवारी कार्यालयीन कामकाजानंतर शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी सदिच्छा भेट देऊन त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली.

प्रा. पाटील यांनीही कुलगुरुंना त्यांच्या मुंबई विद्यापीठातील कामकाजाविषयी, तेथील घडामोडी तसेच सद्यःस्थितीबाबत विचारणा केली. यावेळी श्रीमती सरोज (माई) पाटील उपस्थित होत्या.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
7 NOV 2017
पुढारी

# डॉ. एन. डी. पाटील यांच्या प्रकृतीची कुलगुरूंकडून विचारपूस

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांच्या निवासस्थानी भेट घेऊन प्रकृतीची विचारपूस केली. डॉ. पाटील यांनीही कुलगुरूंना त्यांच्या मुंबई विद्यापीठातील कामकाजाविषयी, घडामोडी तसेच सद्यस्थितीबाबत विचारणा केली. यावेळी सौ. सरोजताई पाटील उपस्थित होत्या.

7 NOV 2017
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात होणार 'ॲडव्हान्सड टेक्नॉलॉजी सेंटर'

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची माहिती : मनुष्यबळ विकासाला मिळणार चालना

प्रतिनिधी
कोल्हापूर

पश्चिम महाराष्ट्रातील उद्योगांना कुशल मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याबरोबरच अभियांत्रिकीतील अत्याधुनिक संशोधनाकरिता शिवाजी विद्यापीठाने पुढाकार घेतला आहे. या अनुषंगाने शिवाजी विद्यापीठातील डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी आणि औरंगाबाद येथील इंडो जर्मन टुल रूम यांच्यात सामंजस्य करारानुसार शिवाजी विद्यापीठात 'ॲडव्हान्सड टेक्नॉलॉजी सेंटर – ए सेंटर फॉर ट्रेनिंग रिसर्च ॲंड डेव्हलपमेंटची' स्थापना करण्यात येणार आहे. या सेंटरच्या माध्यमातून दहावी उत्तीर्ण ते पदव्युतरपर्यंतचे विद्यार्थ्यांना शिक्षण घेता येते. तसेच अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून कौशल्यावर आधारित प्रशिक्षण, संशोधनाच्या माध्यमातून मनुष्यबळ विकासाला चालना मिळणार आहे, असा विश्वास कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केला.

### इंडो जर्मन टूल रूम

देशातील सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगाला चालना देण्यासाठी सरकारने 'इंडो जर्मन टूल रूम'ची स्थापना केली. आय. झी. टी. आर औरंगाबाद उद्योगांना जागतिक दर्जाचे उत्पादन व सेवा प्रदान करते. भारत सरकार, जर्मनीचे संघीय प्रजासत्ताक सरकार व महाराष्ट्र सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने इंडो जर्मन टूल रुम, औरंगाबाद आंतरराष्ट्रीय दर्जाची गुणवत्ता साधने, प्रशिक्षित कर्मचारी तसेच कन्सल्टन्सी देते. महाराष्ट्रात पुणे, नागपूर व मुंबई येथे आय. झी. टी. आर. ची तीन उपकेंद्रे असून महाराष्ट्रातील चौथे उपकेंद्र कोल्हापूर येथे ॲडव्हान्सड टेक्नॉलॉजी सेंटरच्या माध्यमातून विद्यापीठात सुरु झाले आहे.

कुलगुरू डॉ देवानंद शिंदे म्हणाले, विद्यापीठाने गतवर्षी संशोधन व गुणवत्तेच्या जोरावर 'एन. आय. आर.एफ.' मध्ये देशभरातून अठ्ठाविसावे स्थान पटकाविले. नुकतेच राष्ट्रीय उच्चतर शिक्षाअभियान (रुसा) अंतर्गत ३२ विद्यापीठातील यादीत शिवाजी विद्यापीठाचा समावेश झाला आहे. विद्यापीठ स्थानिक उद्योगाला पूरक मनुष्यबळ देऊन रोजगारक्षमता वाढविण्याकरिता प्रयत्न करीत आहे. 'ॲडव्हान्सड टेक्नॉलॉजी सेंटर'च्या माध्यमातून कोल्हापुरातील उद्योगांना आवश्यक 'नीड बेस्ड कोर्सेस' सुरू करण्यात येणार आहेत. भारत सरकारच्या एम. एस. एम. ई. मंत्रालयाअंतर्गत इंडो जर्मन टूल रूम औरंगाबादच्या सहाय्याने अप्लाईड कोर्स दिले जाणार आहेत. भारत सरकारच्या स्टार्ट अप प्रकल्पाअंतर्गत आय.जी.टी.आर.औरंगाबाद येथेही प्रगत संशोधनाची सोय उपलब्ध करून दिली जाणार असून, भविष्यात विद्यापीठात डिपार्टमेंटऑफ टेक्नॉलॉजी येथे पदव्युत्तर अभ्यासक्रमांची सुरुवात केली जाणार आहे.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखा अधिकारी श्री. ए. बी. चौगुले, डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजीचे संचालक डॉ. जयदीप बागी, ॲडव्हान्सड टेक्नॉलॉजी सेंटरचे समन्वयक प्रा. हर्षवर्धन पंडित आदी उपस्थित होते.

### अभ्यासक्रम

ॲटोकॅड, सॉलिडवर्क्स, कटिया, युनिग्राफिक्स, डेलकॅम, मास्टरकॅम, ॲसिस, रेव्हीट आर्किटेक्चर, पी. एल. सी. प्रोग्रामिंग, स्काडा, व्ही. एल. एस. आय., टूल डिझाईन आदी शॉर्ट टर्म (७२–९६ तास), मास्टर सर्टिफिकेट कोर्स इन टूल डिझाईन, मास्टर सर्टिफिकेट कोर्स इन कॅड/कॅम यासह पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन टूल डिझाईन ॲंड कॅड/कॅम,पोस्ट डिप्लोमा इन टूल डिझाईन ॲंड कॅड/ कॅम अभ्यासक्रम आहेत.

7 NOV 2017
Times of India
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 122 colleges sans NAAC ratings

## Out Of 283 SUK-Affiliated Institutes, Only 161 Have Been Accredited

Piyush.Bhusari
@timesgroup.com

**Kolhapur:** Even when the Shivaji University, Kolhapur (SUK) has started preparing for the fourth re-accreditation cycle of the National Assessment and Accreditation Council (NAAC), many affiliated colleges have not even been assessed by the council, reveals a report from the SUK.

According to the university's October report, out of the 283 affiliated colleges, only 161 have been accredited in the first cycle of NAAC assessment, while 122 colleges are yet to be assessed.

For the past few years the directorate of higher education has been warning universities to make NAAC assessment must for their affiliated colleges or to de-recognise them.

An SUK official said the university is regularly instructing the colleges to get the assessment done by the NAAC as soon as possible. For the engineering colleges, the assessment has to be done by the National Board of Accreditation (NBA).

According to the official, all the colleges which have completed five years from the date of their foundation have to go through the accreditation process. Those which have completed an accreditation process five years ago too have to undergo reaccreditation.

D T Shirke, pro-VC of the SUK, told TOI, "The absence of accreditation is more in unaided colleges than in aided ones and hence we are regularly conducting workshops for unaided colleges to make them aware about the need of NAAC accreditation."

He added that, the university directs its affiliated colleges to go through the NAAC assessment every year as a reminder. However, it has been found that many have not been following the directives.

A college principal said that the NAAC assessment is an institute's responsibility and one should not lag in it. The NAAC assessment of an institution denotes the standards of quality as set by the accreditation agency and whether the particular college is following it or not. If the college achieves the standard, the NAAC's goal of quality education fulfils.

On the importance of NAAC, he pointed out that the NAAC grading is necessary because it is accepted in high regards and the grading is acknowledged worldwide.

The principal added that all the educational institutes will have to go through NAAC assessment or an equivalent body's assessment soon, as at least an 'A' grade from NAAC is needed to be eligible for financial grants under the schemes of the Union government like Rashtriya Uchchatar Shiksha Abhiyan (RUSA).

Currently, every educational institution – university as well as college – needs to evaluate itself through NAAC's five-yearly re-accreditation procedure to keep itself updated in terms of academic and administrative performance.

The National Assessment and Accreditation Council (NAAC) is an autonomous body established by the University Grants Commission to assess and accredit institutions of higher education in the country.

### WHY NAAC GRADING IS IMPORTANT?



- The grading regulates quality of education and also ensures that educational institutions keep constant check on their performance
- The assessment helps the UGC to disburse annual finances under various schemes to the government-run and private aided colleges
- It creates an automatic pressure to maintain the education quality and to improvise on the infrastructure facilities to avail of the financial aid from the government

### SUK CURRENT STATUS

- Affiliated colleges: 283
- Colleges with first cycle of NAAC accreditation: 161
- Colleges with second cycle of NAAC accreditation: 113
- Colleges without NAAC accreditation: 122

*(Source: SUK)*

"The absence of accreditation is more in unaided colleges than in aided ones and hence we are regularly conducting workshops for unaided colleges to make them aware about the need of NAAC accreditation
— **D T Shirke** | SUK PRO-VC

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
7 NOV 2017
लोकमत

# म्हैसूरच्या राष्ट्रीय परिषदेत अनिस शेख यांचे यश

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान विभागातील संशोधक विद्यार्थी अनिस शेख यांनी म्हैसूर येथे झालेल्या राष्ट्रीय परिषदेतील पोस्टर प्रेझेंटेशनमध्ये प्रथम क्रमांक पटकाविला.

म्हैसूरमध्ये दि. २६ ते २८ ऑक्टोबरदरम्यान 'न्यूक्लिअर ट्रॅक सोसायटी ऑफ इंडिया' यांच्या सहकार्याने 'सॉलिड स्टेट न्यूक्लीअर डिटेक्टर्स' या विषयावर २० वी राष्ट्रीय परिषद झाली. यामध्ये अनिस शेख यांनी 'सुपर-कपॅसिटरचे अणुउद्योगातील वाढते महत्त्व' या विषयावर पोस्टर प्रेझेंटेशन केले. यामध्ये त्यांनी अणुऊर्जा उद्योगामध्ये ऊर्जा साठवणुकीची वाढीव क्षमता असलेल्या सुपर-कपॅसिटरचे औद्योगिक महत्त्व स्पष्ट केले. उच्च ऊर्जाधारण क्षमतेबरोबरच सुरक्षा, अल्प मेंटेनन्स आणि प्रचलित बॅटऱ्यांपेक्षा अधिक पर्यावरणपूरक, आदी वैशिष्ट्ये त्यांनी यात अधोरेखित केली. त्यांना परिषदेच्या समारोपाच्या समारंभात कुवेंपू विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. पी. वेंकटरामय्या यांच्या हस्ते गौरविण्यात आले. यावेळी 'व्हीव्हीआयईटी'चे प्राचार्य डॉ. एम. रविशंकर, डॉ. आर. पी. चौहान, डॉ. आर. जी. सोनकवडे उपस्थित होते.

7 NOV 2017
महाराष्ट्र टाईम्स
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्राध्यापक, पदवीधरमध्ये मोठी चुरस

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळ व अभ्यास मंडळाच्या निवडणुकीसाठी पात्र उमेदवारांची यादी सोमवारी प्रसिद्ध झाली. शिवाजी विद्यापीठ विकास आघाडी आणि शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघ (सुटा) यांच्यामध्ये शिक्षक, अॅकेडमिक काउन्सिलसाठी थेट लढत आहे. रविवारपासून ३८ उमेदवारी अर्जावरील अपिल सुरू असल्याने पात्र उमेदवारांची यादी जाहीर होण्याची प्रक्रिया सोमवारी सायंकाळी सात वाजेपर्यंत लांबली. प्राचार्य गटातील एका जागेसाठी निवडणूक होणार आहे. विविध अधिकार मंडळासाठी २०० हून अधिक उमेदवार रिंगणात राहिले.

प्राचार्य गटातील दहापैकी आठ उमेदवारांची बिनविरोध निवड झाली आहे. डीटीएनटी प्रवर्गात प्राचार्य चंद्रशेखर तुकाराम कारंडे व प्राचार्य सखाराम तुकाराम शिंगटे यांच्यात लढत होणार आहे. एसटी प्रवर्गात उमेदवार नसल्याने जागा रिक्त राहिली. संस्था प्रतिनिधी गटात सहापैकी जागा बिनविरोध झाल्या. विकास आघाडीचे उमेदवार राजू जयवंतराव आवळे यांचा अर्ज अपिलात मंजूर झाल्याने त्यांच्या बिनविरोध निवडीवर शिक्कामोर्तब झाले.

**२०० हून अधिक उमेदवार पात्र, ११ अभ्यास मंडळे बिनविरोध**

### विकास आघाडीचा आज प्रचाराचा प्रारंभ

शिवाजी विद्यापीठ विकास आघाडीच्यावतीने मंगळवारी (ता.७) प्रचाराचा प्रारंभ होणार आहे. कसबा बावडा येथील डॉ. डी. वाय. पाटील मेडिकल कॉलेज येथे सकाळी ११ वाजता मेळावा आयोजित केला आहे. विद्यापीठ विकास आघाडीचे पदाधिकारी, संस्थाचालक, प्राचार्य संघटना, अभाविपचे पदाधिकारी यांच्या उपस्थितीत मेळावा होईल.

### अभ्यास मंडळाच्या निवडणुका बिनविरोध

विविध अभ्यास मंडळासाठी १०९ उमेदवार पात्र ठरले आहेत. काही अभ्यास मंडळाच्या निवडणुका बिनविरोध झाल्या. तर काही ठिकाणी निवडणूक होत आहे. दरम्यान जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन, लॉ, होम सायन्स शारिरीक शिक्षणशास्त्र विभाग, कम्प्युटर सायन्स, इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजी, बायोकेमिस्ट्री अँड बायो टेक्नॉलॉजी या अभ्यास मंडळासाठी उमेदवार न मिळाल्याने जागा रिक्त राहिल्या.

- प्राचार्य गटातील दहापैकी आठ जागा बिनविरोध
- प्राचार्य गटातील डीटीएनटी जागेसाठी निवडणूक
- संस्था प्रतिनिधी गटातील सहापैकी जागा बिनविरोध
- शिक्षक (प्राध्यापक) गटातील दहा जागेसाठी २८ उमेदवार
- पदव्युत्तर शिक्षक गटातील तीन जागेसाठी नऊ उमेदवार
- नोंदणीकृत पदवीधर गटात नऊ जागेसाठी ३० जण रिंगणात
- पदवीधर गटातील प्रा. लोभाजी भिसे बिनविरोध
- अॅकेडमीक कौन्सिलमधील शिक्षकसाठी ११ जण रिंगणात
- अॅकेडमीक कौन्सिलमध्ये डीटीएनटीतून प्रा. शर्मिला साबळे बिनविरोध
- अॅकेडमीक कौन्सिलमध्ये शिक्षक ओबीस व एसटी प्रवर्ग रिक्त
- २५ अभ्यास मंडळाच्या निवडणुकीसाठी १०९ उमेदवार पात्र
- सात अभ्यास मंडळांना उमेदवार नाहीत
- अकरा अभ्यास मंडळे बिनविरोध

**शिक्षक गटात २८ उमेदवार**

विद्यापीठ विकास आघाडी आणि सुटा यांच्यामध्ये शिक्षक गटातील दहा जागासाठी थेट लढत आहे. दहा जागेसाठी २८ उमेदवार रिंगणात आहेत. शिक्षक खुल्या गटातील पाच जागेसाठी प्रा. सतीश घाटगे, प्रा. मनोज गुजर, प्रा. किशोर जाधव, प्रा. चंद्रकांत माने,

## सिनेट निवडणूक

प्रा. गिरीश नाईक, प्रा. अरुण पाटील, प्रा. अशोकुमार पाटील, प्रा. भारत पाटील, प्रा. दत्तात्रय पाटील, प्रा. वसंत पाटील, प्रा. युवराज पाटील, प्रा. महादेवी पवार, प्रा. बाळासाहेब सोळोखे आणि प्रा. लक्ष्मण वाघमाडे हे रिंगणात आहेत. पदव्युत्तर शिक्षक गटात विद्यापीठ विकास आघाडी आणि विद्यापीठ विकास मंचात लढत होणार असून तीन जागेसाठी नऊ जण रिंगणात आहेत. यामध्ये प्रा. उत्तम बोंबले, प्रा. एस. डी. डेळेकर, प्रा. प्रवीणकुमार पाटील, प्रा. तृप्ती करेकट्टी, प्रा. भारती पाटील, प्रा. उर्मिला पोळ, प्रा. निखिल गायकवाड, प्रा. श्रीकृष्ण महाजन, प्रा. एस. एस. पन्हाळकर यांचा समावेश आहे. नोंदणीकृत पदवीधर गटात नऊ जागेसाठी ३० उमेदवार पात्र ठरले आहेत.

- 7 NOV 2017

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ निवडणुकीसाठी आजपासून रणधुमाळी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ अधिसभा आणि विविध अधिकार मंडळाच्या निवडणुकीसाठी पात्र उमेदवारांची यादी सोमवारी अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली. त्यामुळे आता खऱ्या अर्थाने निवडणुकीच्या प्रचारात रंग भरला. मंगळवारपासून (दि.७) खऱ्या अर्थाने निवडणुकीची रणधुमाळी सुरू होणार आहे.

शिवाजी विद्यापीठाची निवडणूक यंदा नव्या विद्यापीठ कायद्यानुसार होत आहे. त्यामुळे सुरुवातीपासूनच या निवडणुकीबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे. आज निवडणुकीच्या प्रक्रियेतील महत्त्वाची मानली जाणारी पात्र उमेदवारांची यादी अधिकृत संकेतस्थळावरून प्रसिद्ध करण्यात आली. विभागनिहाय उमेदवारांच्या यादीमध्ये अनेक अभ्यासमंडळे बिनविरोध झाली आहेत. त्यामुळे या ठिकाणी चुरस कमी दिसून येते.

- ▶ पदवीधरसाठी प्रचाराच्या तोफा धडाडणार
- ▶ विभागनिहाय उमेदवारांची पात्र यादी प्रसिद्ध

**पदवीधर आणि शिक्षक गटात चुरस**

सर्वात लक्षवेधी पदवीधर विभाग आणि शिक्षक गटांत मोठी चुरस आहे. या विभागातील उमेदवारांकडून आधीपासूनच जोमात प्रचार सुरू आहे. पदवीधर गटांतील एसटी प्रवर्गातील जागा बिनविरोध झाली आहे. त्यामुळे नऊ जागांसाठी लढत होत आहे. या गटांत विकास आघाडीसमोर आजी-माजी विद्यार्थी कृती समितीने आव्हान उभे केले आहे. सुटाच्या भूमिकेलाही पदवीधर गटांत महत्त्व आहे. शिक्षक गटांत आघाडी आणि सुटा यांच्यात तुल्यबळ लढत रंगणार आहे.

## आघाडीचा फॉर्म्युला निश्चित?

*सुटा विरोधात इतर सर्वांना संघटित केलेल्या विकास आघाडीच्या जागा फॉर्म्युलाबाबत सोमवारी डी. वाय. पाटील मेडिकल कॉलेजमध्ये बैठक झाली. या बैठकीत पदवीधर विभागात जास्त जागांसाठी विकास मंच आग्रही होता; पण आघाडी आणि मंच यांच्यात यावर तोडगा काढण्यात यश आला. मंचसाठी चार जागा आणि आघाडीसाठी सहा जागा लढवणार असल्याचे सांगण्यात आले. शिक्षक गटांतही मंचकडून जागांबाबत आग्रह होता. यावर आज तोडगा निघालेला नाही. मात्र , मंगळवारी (दि.७) सकाळी जागा वाटपातील निश्चित फॉर्म्युला जाहीर केला जाणार आहे.*

## तब्बल २५८ उमेदवार रिंगणात

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ निवडणुकीसाठी सोमवारी पात्र उमेदवारांची यादी प्रसिद्ध झाली. एकूण ३८ अपिलांपैकी तिघांनी माघार घेतली. अपिलांतील सात मंजूर झाली आहेत. त्यामुळे विविध विभागांत १४६ जागांसाठी २५८ उमेदवार रिंगणात आहेत.

शिवाजी विद्यापीठ निवडणुकीसाठी एकूण ३८ उमेदवारांनी अपिल केले होते. या अपिलावर रविवारी (दि.५) रात्री उशिरापर्यंत सुनावणी झाली. यामध्ये प्राचार्य-२, व्यवस्थापन प्रतिनिधी-१, विद्यापीठ शिक्षक-१, नोंदणीकृत पदवीधर-२, अभ्यासमंडळे विभागप्रमुख-१ अशी सात अर्जदारांची अपिल मंजूर झाली. त्यामुळे या गटांत संबंधित पात्र ठरले आहेत.



शिवाजी विद्यापीठातून

- ▶ संस्था गटांत सर्व जागा बिनविरोध
- ▶ प्राचार्य गटांत दहापैकी आठ जागा बिनविरोध
- ▶ विविध गटांत सात अपिल मंजूर

**सुटाचे आव्हान**

सुटाकडून ॲकॅडेमिक ६, अधिसभा १० व इंजिनिअरिंग विषय वगळता अन्य अभ्यास मंडळाच्या जागा लढवणार आहे. सुटातील शिक्षक गटांतील एनटी प्रवर्गातील उमेदवारीवरून सुरुवातीपासून बरेच घमासान झाले आहे. या प्रकरणावरून गटबाजीची शक्यता दिसून येते.

" शिवाजी विद्यापीठाची निवडणूक प्रक्रिया ही नव्या कायद्यातील परिनियमानुसार सुरू आहे. त्यामुळे ही निवडणूक प्रक्रिया कायदेशीर आहे. निवडणूक प्रक्रिया बेकायदेशीर असल्याचा आरोप नुकताच शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघाकडून करण्यात आला होता.

**- डॉ. विलास नांदवडेकर, कुलसचिव**

7 NOV 2017

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# १४६ जागांसाठी २५८ उमेदवार रिंगणात

## प्राध्यापक, अधिकृत पदवीधर नोंदणी गटात सर्वाधिक उमेदवार

कोल्हापूर, ता. ६ : शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा आणि विविध अधिकार मंडळाच्या निवडणुकीत ३८ अर्ज पैकी ७ उमेदवारांचे अपिल मंजूर झाले आहे. त्यामुळे विविध १४६ जागांसाठी २५८ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात राहिले आहेत. याबाबतची यादी शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने संकेतस्थळावर प्रसिद्ध केली. अपिलाचा निकाल जाहीर झाल्यामुळे आज निवडणुकीचे चित्र स्पष्ट झाले.

### अधिसभा, अधिकार मंडळ निवडणूक

#### असे ठरले अपिल पात्र उमेदवार

- प्राचार्य प्रतिनिधी गट – २
- व्यवस्थापन परिषद प्रतिनिधी – १
- विद्यासभा अधिसभा – १
- विभाग प्रमुख अभ्यास मंडळ – १
- नोंदणीकृत पदवीधर प्रतिनिधी – २
- विद्यापीठ शिक्षक – ०



प्राध्यापक गटात दहा जागांसाठी आता २५ उमेदवार आहेत, तर अधिकृत पदवीधर नोंदणी गटात ९ जागांसाठी ३० उमेदवार रिंगणात आहेत. या दोन्ही गटात सर्वाधिक उमेदवार असल्याचे आज स्पष्ट झाले. पदवी शिक्षक गटात तीन जागांसाठी ९, तर संस्था प्रतिनिधी गटात सहा जागांसाठी ५ बिनविरोध झाल्यामुळे एका जागेसाठी अपिल दाखल झाले होते. या अपिलात राजू जयवंतराव आवळे यांचे अपिल मंजूर झाल्यामुळे त्यांची आता बिनविरोध निवड जवळजवळ निश्चित आहे. विविध अधिकार मंडळाच्या १४६ जागांसाठी ३१८ अर्ज दाखल झाले होते. अर्ज माघारीचा शेवटच्या दिवशी ६७ जणांनी माघार घेतल्याने १५१ उमेदवार रिंगणात होते. अर्ज छाननी प्रक्रियेत ज्या उमेदवारांचा अर्ज अवैध ठरला आहे, अशा ३८ उमेदवारांनी विद्यापीठाकडे अपिल केले आहे. सात उमेदवारांचे अर्ज पात्र ठरले. प्राचार्य गटातील आठ जागांसाठी निवडणूक बिनविरोध झाल्या आहेत. प्राचार्य प्रतिनिधी गटातून एन.टी. प्रवर्गातून प्राचार्य डॉ. एस. टी. शिंगटे, प्राचार्य चंद्रशेखर तुकाराम कारंडे यांनी अपिल केले होते. या दोन्ही उमेदवारांचे अर्ज पात्र ठरल्याने या एका जागेसाठी निवडणूक लागण्याची शक्यता आहे.

दरम्यान, निवडणूक विभागाकडून सुरू असलेली सर्व प्रक्रिया कायदेशीर असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. याबाबत काल अक्षेप घेतला होता.

7 NOV 2017

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रचाराची रणधुमाळी आजपासून

## शिवाजी विद्यापीठ : विविध अधिकारी मंडळाची निवडणूक

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा आणि विविध अधिकार मंडळाच्या निवडणुकीतील अपात्र उमेदवारांच्या अर्जांवर रविवारी रात्री उशिरापर्यंत सुनावणी झाली. ३८ अर्जांपैकी सात उमेदवारांचे अर्ज पात्र ठरल्याने आता विविध १४६ जागांसाठी २५८ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. याबाबतची यादी शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने संकेतस्थळावर सोमवारी रात्री प्रसिद्ध केली.

आज, मंगळवारपासूनच खऱ्या अर्थाने प्रचाराची रणधुमाळी सुरु होणार आहे.

विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळाच्या १४६ जागांसाठी ३१८ अर्ज दाखल झाले होते. अर्ज माघारीचा शेवटच्या दिवशी ६७ जणांनी माघार घेतल्याने २५१ उमेदवार आता रिंगणात होते. अर्ज छाननी प्रक्रियेत ज्या उमेदवारांचा अर्ज अवैध ठरला आहे, अशा ३८ उमेदवारांनी विद्यापीठाकडे अपिल केले आहे. यावर रविवारी रात्री उशिरापर्यंत सुनावणी सुरू होती. यामधून सात उमेदवारांचे अर्ज पात्र ठरले. प्राचार्य गटातील आठ जागांसाठी निवडणूक बिनविरोध झाल्या आहेत. प्राचार्य प्रतिनिधी गटातून एन.टी. प्रवर्गातून प्राचार्य डॉ. एस.टी. शिंगटे व प्राचार्य चंद्रशेखर तुकाराम कारंडे यांनी अपिल केले होते, या दोन्ही उमेदवारांचे अर्ज पात्र ठरल्याने या एका जागेसाठी निवडणूक लागण्याची शक्यता आहे.

सुटा विरोधात इतर सर्वांनी एकत्र येवून स्थापन केलेल्या विकास आघाडीच्या जागाबाबत बैठक झाली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
7 NOV 2017
पुण्यनगरी

# सिनेट निवडणूक : २५८ उमेदवार रिंगणात

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
शिवाजी विद्यापीठाची अधिसभा आणि विविध अधिकार मंडळाच्या १४६ जागांसाठी २५८ उमेदवार रिंगणात आहेत. शिक्षक, नोंदणीकृत पदवीधर आणि विविध अभ्यास मंडळांच्या गटामध्ये निवडणुकांची चुरस होणार आहे.

सोमवारी विद्यापीठ विकास आघाडी आणि विकास मंच यांच्यामध्ये जागा वाटपासाठी बैठक पार पडली. या बैठकीत पदवीधरसाठी विद्यापीठ विकास आघाडीला ६ आणि विकास मंचला ४ असा तोडगा काढण्यात आला, तर विद्यापीठ अधिसभा निवडणुकीत बिनविरोध निवडून आलेल्या प्राचार्य संस्थापकासह इतर उमेदवारांचा सत्कार मंगळवारी सकाळी ११ वाजता डॉ. डी. वाय. पाटील इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये होणार आहे. गटनिहाय अपील अर्ज पुढीलप्रमाणे : प्राचार्य गट २, व्यवस्थापन प्रतिनिधी १, विद्या परिषद शिक्षक १, नोंदणीकृत पदवीधर २ आणि विभागप्रमुख अभ्यासमंडळे १. दिवसभरात ३ अपील अर्ज माघारी घेण्यात आले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
7 NOV 2017
सकाळ

# 'जीएसटी' विकासासाठी पोषक : कांबळे

शाहूनगर, ता. ६ : 'जीएसटी'मुळे देशाच्या आर्थिक विकासाला पोषक वातावरण निर्माण होणार आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. पी. एस. कांबळे यांनी केले. कुरुकली (ता. करवीर) येथील भोगावती महाविद्यालयात अर्थशास्त्र व वाणिज्य विभागाच्या वतीने आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. दिनकर पाटील होते. प्रा.डॉ. कांबळे म्हणाले, जीएसटीमुळे शेतीचा विकास गतिमान होईल. तसेच उद्योग व सेवा क्षेत्रातील संबंधित वस्तू व सेवांसाठी योग्य आणि माफक दर ठेवल्यामुळे उद्योग क्षेत्राचाही विकास होईल. यावेळी त्यांनी जीएसटी कराची अनुकूल व प्रतिकूल बाजू मांडली. अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा.डॉ. डी. ए. चौगले यांनी प्रास्ताविक केले. प्रा. आर. के. वाकरेकर यांनी परिचय करून दिला. वाणिज्य विभागप्रमुख प्रा. एम. ए. कांबळे यांनी आभार मानले. प्रा. किरण पाटील यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी प्रा. एस. आर. चौगले, प्रा. पी. बी. कांबळे, प्रा. एस. एन. साळोखे, प्रा.आर. बी. गायकवाड, प्रा. एम. डी. पाटील, एस. के. परीट आदी उपस्थित होते.

7 NOV 2017

सकाळ

# गडहिंग्लजच्या शिवराज महाविद्यालयाला

## नेसरीतील अमित पाटील, म्हसवडची रेश्मा केवटे ठरले स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू;

### आंतरविभागीय मैदानी स्पर्धा...



कऱ्हाड : शिवराज महाविद्यालयाच्या संघास सर्वसाधारण विजेतेपदाचा चषक देताना अमरसिंह पाटणकर, प्रकाशराव पाटील, डॉ. गायकवाड आदी.

कऱ्हाड, ता. ६ : येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठाच्या आंतर विभागीय मैदानी स्पर्धेचे सर्वसाधारण विजेतेपद गडहिंग्लजच्या शिवराज महाविद्यालयाने पटकावले. नेसरी येथील अमित पाटील व म्हसवड येथील रेश्मा केवटे हे स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू किताबाचे मानकरी ठरले.

ज्येष्ठ नेते (कै.) पी. डी. पाटील जन्मशताब्दीनिमित्त येथील यशवंतराव चव्हाण शास्त्र महाविद्यालयाने विद्यापीठाच्या आंतर विभागीय मैदानी स्पर्धेचे संयोजन केले होते. वेणूताई चव्हाण महाविद्यालयाच्या मैदानावर शनिवारीपासून या मैदानी स्पर्धा सुरू होत्या. त्याचा आज कोयना शिक्षण संस्थेचे अमरसिंह पाटणकर यांच्या उपस्थितीत व शिवाजी शिक्षण संस्थेचे सचिव प्रकाशराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली समारोप झाला.

निकाल असा : धावणे : २०० मीटर- सचिन धोत्रे (भोसले कॉलेज कोरेगाव), कृष्णात पाटील (न्यू कॉलेज कोल्हापूर), कांझीराम स्टेन्जू (व्हीसीके कोल्हापूर). ४०० मीटर- कृष्णात पाटील (न्यू कॉलेज), रामदास पाटील (टीकेके नेसरी), ओंकार गावडे (आरबीएम चंदगड). १५०० मीटर- अमित पाटील (टीकेके नेसरी), अक्षय माने (बिद्री कॉलेज), रोहित थोरात (वायसी कॉलेज कऱ्हाड). ११० मीटर अडथळा - सौरभ जाधव (केबीपी इस्लामपूर), अभिजित पोवार (नाईट कॉलेज कोल्हापूर), असफाक तांबोळी (मुधोजी फलटण). थाळीफेक- कीर्तिकुमार बेनके, शुभम पाटील (आरबीएम चंदगड), ओंकार भोसले (व्हीसी कॉलेज कऱ्हाड). लांब उडी- अनिकेत घोरपडे (आरएसए ॲण्ड सी रुकडी), रोहित रोमण (दहिवडी कॉलेज), एकनाथ कुंभार (बीडीसी पाटण). ४०० मीटर - सुचित्रा घेवडे (शिवराज कॉलेज गडहिंग्लज), शीतल पाटील (आजरा कॉलेज), रेश्मा तेजम (शिवराज कॉलेज गडहिंग्लज). १५०० मीटर धावणे- प्रतीक्षा पाटील

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 7 NOV 2017
सकाळ

# विद्यापीठ आंतरविभागीय कबड्डी स्पर्धेत कोल्हापूरचे शाहू कॉलेज अजिंक्य

इचलकरंजी, ता. ६ : येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठ विभागीय आंतरविभागीय कबड्डी स्पर्धेत कोल्हापूरच्या राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज संघाने अजिंक्यपद पटकाविले. वारणानगरचा यशवंतराव चव्हाण कॉलेज संघ उपविजेता ठरला. यजमान नाईट कॉलेज संघ तृतीय आला.

येथील नाईट कॉलेज व रोटरी क्लब, हेरिटेजतर्फे ही स्पर्धा जयहिंद मंडळाच्या क्रीडांगणावर झाली. अंतिम सामना शाहू कॉलेज व चव्हाण कॉलेज यांच्यात झाला. ४४ विरुद्ध ३४ अशा गुण फरकांनी शाहू कॉलेजने हा सामना जिंकत विजेतेपद पटकाविले.

तत्पूर्वी, पहिला उपांत्य पूर्व सामना नाईट कॉलेज व वारणा कॉलेज यांच्यात झाला. यामध्ये वारणा कॉलेजने २६ विरुध्द २४ अशा गुणफरकांनी जिंकला. तर शाहू कॉलेज व एसजीएम कॉलेज (कराड) यांच्यात दुसरा उपांत्य सामना झाला. यामध्ये ३३ विरुध्द ९ अशा गुणांच्या फरकाने शाहू कॉलेजने एकतर्फी विजय मिळविला. तृतीय क्रमांकासाठी यजमान नाईट कॉलेज व एसजीएम कॉलेज (कराड) यांच्यात लक्षवेधी लढत झाली. यात नाईट कॉलेज संघाने सामना जिंकला.

जनसंपर्क कक्ष
7 NOV 2017 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वेटलिफ्टिंग, पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत विविध महाविद्यालयांचे यश

प्रतिनिधी
कोल्हापूर

कुरुंदवाडमधील तबक उद्यानात झालेल्या शिवाजी विद्यापीठ आंतरमहाविद्यालयीन वेटलिफ्टिंग-शरीरसौष्ठव स्पर्धेत जिल्ह्यातील विविध महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थींनी उल्लेखनिय यश मिळवत ५ सुवर्णासह ११ पदके पटकावली. एस. के. पाटील महाविद्यालयाने स्पर्धेचे आयोजन केले होते. पॉवरलिफ्टिंग स्पर्धेतील सुवर्ण पदक विजेत्या ५ पॉवरलिफ्टरांची उदयपूरमध्ये (राजस्थान) होणाऱ्या अखिल भारतीय विद्यापीठ पॉवरलिफ्टिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

कोल्हापूर, सांगली, सातारा या तिन्ही जिल्ह्यातील शंभरावर महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थीनींनी वेटलिफ्टिंग व शरीरसौष्ठव स्पर्धेत सहभाग घेतला होता. यापैकी पॉवरलिफ्टिंग स्पर्धेतील ५७ किलो वजन गटात शहाजी कॉलेजच्या सोनल सावंतने सुवर्ण तर न्यू कॉलेजच्या प्रांजली ढेरेने रौप्य पदक पटकावले. ८४ किलोत जयसिंगपूर कॉलेजच्या शामल शिंदेने रौप्य आणि गोखले कॉलेजच्या प्राजक्ता व्हटकरने कास्य पदक मिळवले.

मुलांच्या पॉवरलिफ्टिंग स्पर्धेतील ५९ किलो वजन गटात शहाजी कॉलेजच्या निशांत शेलारने, ७४ किलो गटात आर. डी. माने कॉलेजच्या (कागल) यशवर्धन दिंडेने, ८३ किलो गटात वारणा कॉलेजच्या अजिंक्य चौगुलेने सुवर्ण पदक मिळवले. ९३ किलो गटात शहाजी कॉलेजच्या स्वप्निल घडशीने रौप्य आणि १०५ किलो गटात विटा कॉलेजच्या विशाल खटावकरने सुवर्ण पदक पटकावले.

शरिरसौष्ठव स्पर्धेतील ७० किलो वजन गटात गोखले कॉलेजच्या संग्राम जाधवने रौप्य तर विठ्ठलराव पाटील महाविद्यालयच्या (कळे) सुशांत चौगुलेने कास्य पदक मिळवले. तसेच ८० किलो गटात महावीर महाविद्यालयाच्या विश्वजित ठाकरेने कास्य पदक जिंकले. वरील सर्व यशस्वी वेटलिफ्टिंगपटू व शरीरसौष्ठवपटूंना ज्येष्ठ मार्गदर्शक बिभीषण पाटील व शहाजी कॉलेजचे प्रा. प्रशांत पाटील यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 7 NOV 2017
पुढारी



**वारणानगर : शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय मुलांच्या बास्केटबॉल स्पर्धेत विजेतेपद पटकाविलेल्या नाईट कॉलेजच्या संघाला पारितोषिक देताना दादा जाधव, डॉ. कोळेकर, प्रा. आण्णासो पाटील, उदय जाधव आदी.**

# नाईट कॉलेजला विजेतेपद

**वारणानगर : प्रतिनिधी**

येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय मुलांच्या बास्केटबॉल स्पर्धेत साताऱ्याच्या यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स महाविद्यालयाच्या संघाला हरवून कोल्हापूरच्या नाईट कॉलेजने विजेतेपद पटकाविले. तर मिरज महाविद्यालयाने तृतीय क्रमांक मिळविला. तर न्यू कॉलेजला चतुर्थ क्रमांकावर समाधान मानावे लागले.

वारणानगर येथील लालबहादूरशास्त्री भवन शेजारील क्रीडांगणावर विद्युतप्रकाश झोतात स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील १२ संघांनी सहभाग घेतला होता.

या स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ वारणा साखर कारखान्याचे प्रशासकीय अधिकारी दादा जाधव, डॉ. कोळेकर, प्रा. आण्णासो पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी अध्यक्ष सुरेश फराकटे, नंदकुमार पाटील, आकाश बनसोडे व डॉ. मगदूम उपस्थित होते. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी बकस कुरणे, उदय जाधव व उदय पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
7 NOV 2017
Times of India

# Provide link of Vidya Lakshmi Portal: UGC

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The University Grants Commission (UGC) has asked all higher educational institutions (HEIs) to provide the link of Vidya Lakshmi Portal on their websites.

In its circular, UGC secretary P K Thakur said the ministry of human resource development (MHRD) has sent a communication in this regard to publicise the initiative by providing the link of Vidya Lakshmi Portal on the home page of HEIs' website so that maximum number of students can avail the benefit of this service.

"Vidya Lakshmi is a first of its kind portal for students seeking education loan. This portal has been developed under the guidance of ministry of finance, MHRD and Indian Banks Association, with a view to enable all poor and middle class students to pursue higher education. The portal may prove to be highly useful for students/parents/institutions as it is user friendly and information friendly," the letter read.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
7 NOV 2017
सकाळ

# डी. वाय. पाटील विद्यापीठात सूक्ष्म तंत्रज्ञानावर आंतरराष्ट्रीय परिषद

कोल्हापूर, ता. ६ : डी. वाय. पाटील विद्यापीठात नऊ ते ११ नोव्हेंबर कालावधीत मटेरियल सायन्स, बायोटेक्नॉलॉजी, मेडिकल सायन्सेस या शाखांचा सहसंबंध यावर सूक्ष्म तंत्रज्ञानाची परिषद होणार आहे. परिषदेत नवीन संशोधन आणि तंत्रज्ञान यावर तीन दिवस चर्चा होईल. यामध्ये प्रा. रुडॉल्फ हाल्जे (जर्मनी), प्रा. टी. पी. गुजर (जर्मनी), प्रा. वेन पिंग पेत्र (तैवान), जे. जे. शिम आणि जे. एच. किम (दक्षिण कोरिया), डॉ. दीपक डुबल (ऑस्ट्रेलिया), डॉ. डी. एस. ढवळे (कतार), डॉ. झनकारे (मुंबई),प्रा. एस. के. जैन (सागर), डॉ. दिवाण प्रकाश (हैदराबाद), डॉ. रमेश भोंडे (पुणे), डॉ. अंजली शिरसस आणि डॉ. प्रदीप महाजन (पुणे) हे आपल्या संशोधनाची माहिती परिषदेत देतील. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, डी. वाय. पाटील एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील, माजी कुलगुरु डॉ. एस. एच. पवार प्रमुख उपस्थित असतील. संशोधन संचालक डॉ. सी. डी. लोखंडे, अधिष्ठाता डॉ. आर. के. शर्मा, कुलसचिव डॉ. विश्वनाथ भोसले, डॉ. अरविंद गुलबाके संयोजन करतील. कसबा बावडा येथील डी. वाय. पाटील वैद्यकीय महाविद्यालयात ही परिषद होईल. सॉलिड स्टेट इलेक्ट्रो केमिस्ट्री या जर्नलचे प्रकाशन प्रा. होल्ज, प्रा. डुबल यांच्या हस्ते होणार आहे.

7 NOV 2017
महाराष्ट्र टाईम्स
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'डीवाय'मध्ये आंतरराष्ट्रीय परिषद

**कोल्हापूर :** डी. वाय. पाटील विद्यापीठात ९ ते ११ नोव्हेंबरदरम्यान मटेरियल्स सायन्स, बायोटेक्नॉलॉजी आणि मेडिकल सायन्स या शाखांचा सहसंबंध या विषयावर सूक्ष्मतंत्रज्ञान परिषद आयोजित केली आहे. परिषदेत नवनवीन संशोधन व तंत्रज्ञान याविषयी तीन दिवस चर्चासत्र होणार आहे. परिषद डी. वाय. पाटील मेडिकल कॉलेज येथे होणार आहे.

या आंतरराष्ट्रीय परिषदेत प्रा. रुडॉल्फ हाल्जे (जर्मनी), प्रा. टी. पी. गुजर (जर्मनी), प्रा. वेन पिंग पेत्र (तैवान), प्रा. जे. जे. शिम व जे. एच. किम (साउथ कोरिया), डॉ. दीपक डुबल (ऑस्ट्रेलिया), डॉ. डी. एस. ढवळे (कतार), डॉ. झनकारे (मुंबइ), प्रा. एस. के. जैन (सागर), डॉ. प्रकाश दिवाण(हैदराबाद), डॉ. रमेश भोंडे (पुणे), डॉ. अंजली शिरसस व डॉ. प्रदीप महाजन (पुणे) संशोधनाविषयी संपूर्ण माहिती देणार आहेत.

कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणाऱ्या या परिषदेला संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील व डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एस. एच. पवार यांची उपस्थिती लाभणार आहे. संचालक डॉ. सी. डी. लोखंडे, अधिष्ठाता डॉ. आर. के. शर्मा, कुलसचिव डॉ. विश्वनाथ भोसले, डॉ. अरविंद गुलबाके संयोजन करीत आहेत. यावेळी सॉलिड स्टेट इलेक्ट्रो केमिस्ट्री या जर्नलचे प्रकाशन प्रा. रुडॉल्फ होल्ज व प्रा. डी. पी. डुबल यांच्याहस्ते होणार आहे.

कॅम्पस हॅपनिंग्ज